दैनिक आरंभ मराठी
www.arambhmarathi.com


सुविचार
स्वतःवर विश्वास ठेवा, तोच यशाचा खरा मार्ग आहे.


SS MOBILE®
धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक मोबाईल विक्री होणारे, विश्वसनीय ठिकाण.
(नवनवीन ऑफर जाणून घेण्यासाठी आजच संपर्क करा)
जिजाऊ चौक, बार्शी नाका, धाराशिव.
Mo.7841810075/8329723615




कोल्हापूर | सांगली | सातारा | सोलापूर | धाराशिव | लातूर | वर्ष 3 रे | अंक 71 | गुरुवार, 4 जून 2026 | पाने 04 | किंमत रू.4 | epaper.arambhmarathi.com


# स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्या व्यवसाय,पोलिसांची धडक कारवाई


## पाच महिलांची सुटका, व्यवस्थापक आणि चालकावर गुन्हा दाखल

**आरंभ मराठी । धाराशिव**

जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय आणि आनंदनगर पोलिस स्टेशनपासून हाकेच्या अंतरावर स्पा सेंटरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश झाला आहे. शहरातील एका स्पा सेंटरमध्ये सुरू असलेल्या अनैतिक देहव्यापारावर पोलिसांनी धडक कारवाई करत पाच महिलांची सुटका केली असून संबंधित व्यवस्थापक, चालक व इतर संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई मंगळवारी (दि.२) अनैतिक मानवी वाहतूक (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ अंतर्गत करण्यात आली. पोलीस अधीक्षक रीतू खोखर आणि अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक अमोल मोहिते यांना प्राप्त झालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे धाराशिव शहरातील ‘ओरा स्पा सेंटर’वर छापा टाकण्यात आला. कारवाईपूर्वी पंटरच्या माध्यमातून माहितीची खातरजमा करण्यात आली. त्यानंतर



शासकीय पंचांच्या उपस्थितीत छापा टाकून संपूर्ण कायदेशीर प्रक्रिया पार पाडण्यात आली. या स्पा सेंटरवर स्पा सर्व्हिसच्या नावाखाली खुलेआमपणे वेश्या व्यवसाय सुरू होता. शहराच्या मध्यवर्ती आणि गजबजलेल्या




भागातच हा व्यवसाय सुरू असूनही पोलिसांना आजपर्यंत या प्रकरणाची माहिती अगोदरच कशी काय मिळाली नाही ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. या कारवाईत पोलीस निरीक्षक एम. एन. शेळके (एएचटीयू), पोलीस उपनिरीक्षक सोनटक्के, पोलीस अंमलदार माने, दूधभाते, कंदळे, नाईकवडी, किवंडे, केवके तसेच महिला पोलीस हवालदार पुरी, जाधव आणि चालक यांनी सहभाग घेतला. छाप्यामध्ये संबंधित स्पा सेंटरमध्ये व्यावसायिक लैंगिक शोषण व अनैतिक व्यापार सुरू असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यानंतर संबंधित व्यवस्थापक, चालक आणि इतर आरोपींविरुद्ध अनैतिक मानवी वाहतूक (प्रतिबंध) अधिनियमातील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. कारवाईदरम्यान एकूण पाच महिलांची सुटका करण्यात आली असून त्यांना पुढील कायदेशीर कार्यवाही व पुनर्वसनासाठी संबंधित प्राधिकरणाकडे पाठविण्यात आले आहे. धाराशिव जिल्ह्यातील अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेची जबाबदारी परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक अमोल मोहिते यांच्याकडे सोपविण्यात आली असून जिल्ह्यातील बेकायदेशीर आणि अनैतिक कृत्यांवर कडक नजर ठेवण्यात येत आहे. अवैध धंद्यांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींविरुद्ध कठोर कारवाई सुरूच राहणार असून अशा व्यवसायांना कोणतीही मुभा दिली जाणार नाही, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

# येडेश्वरी मंदिर परिसरात अवैध पार्किंग, वादातून वारकरी दाम्पत्याला मारहाण

### महिला भाविकाचे दागिने हिसकावल्याचा आरोप; मंदिर परिसरातील सुरक्षेवर पुन्हा प्रश्नचिन्ह

**आरंभ मराठी । येरमाळा**

राज्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या श्री येडेश्वरी देवी मंदिर परिसरात अवैध पार्किंगच्या वादातून भाविकांना मारहाण करून महिला भाविकांचे दागिने हिसकावल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (ता.२) दुपारी साडेचारच्या सुमारास घडली. या घटनेमुळे मंदिर परिसरातील सुरक्षाव्यवस्था आणि अवैध पार्किंगच्या प्रश्नावर पुन्हा एकदा गंभीर चर्चा सुरू झाली असून भाविकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कडा (ता. आष्टी, जि. बीड) येथील ह.भ.प. परमेश्वर केरुळकर व त्यांच्या पत्नी अधिक मासानिमित्त श्री येडेश्वरी देवीच्या दर्शनासाठी आले होते. मंदिर परिसरात वाहन पार्किंग करण्याच्या कारणावरून त्यांचा काही अवैध पार्किंग वसुली करणाऱ्यांशी वाद झाला. हा वाद विकोपाला गेल्यानंतर चार ते पाच जणांच्या टोळक्याने केरुळकर दाम्पत्याला मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या



मारहाणीत परमेश्वर केरुळकर यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्या पत्नीच्या अंगावरही मारहाणीच्या जखमा झाल्याचे सांगण्यात आले. गोंधळाच्या परिस्थितीत त्यांच्या पत्नीच्या अंगावरील दागिने हिसकावून घेतल्याचाही गंभीर आरोप करण्यात आला आहे. या घटनेनंतर मंदिर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. येडेश्वरी मंदिर परिसरात अवैध पार्किंगचा प्रश्न अनेक वर्षांपासून कायम आहे. काही खाजगी जागाधारक तसेच अतिक्रमणधारक आपल्या जागेत वाहने उभी करून भाविकांकडून मनमानी पद्धतीने पार्किंग शुल्क आकारत असल्याच्या तक्रारी सातत्याने होत आहेत. अनेक ठिकाणी अधिकृत परवानगी नसतानाही वाहनधारकांकडून पैसे वसूल केले जात असल्याचे भाविकांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, काही ठिकाणी बनावट पावत्या देऊन भाविकांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याच्याही तक्रारी यापूर्वी समोर आल्या आहेत. पार्किंग शुल्कावरून वारंवार वाद, शिवीगाळ आणि मारहाणीच्या घटना घडत असतानाही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने अवैध पार्किंगधारकांचे मनोबल वाढल्याचा आरोप स्थानिक नागरिक आणि भाविकांकडून केला जात आहे.

### प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येत असताना मंदिर परिसरात शिस्तबद्ध आणि सुरक्षित पार्किंग व्यवस्था नसल्याने भाविकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. देवस्थान प्रशासन, ग्रामपंचायत, महसूल विभाग आणि पोलीस प्रशासन यांच्यात प्रभावी समन्वय नसल्यामुळे हा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत असल्याची भावना भाविकांनी व्यक्त केली आहे.

### कठोर कारवाईची मागणी

वारकरी दाम्पत्यावरील मारहाण आणि दागिने हिसकावल्याच्या आरोपांनंतर आता महसूल, पोलीस आणि देवस्थान प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून मंदिर परिसरातील अवैध पार्किंग व्यवसायावर लगाम घालावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. परिसरातील सर्व पार्किंगची चौकशी करून अधिकृत आणि अनधिकृत पार्किंगची स्पष्ट विभागणी करावी तसेच दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी भाविकांकडून करण्यात येत आहे.

## कायमस्वरूपी नोकरीचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार

**नळदुर्ग** :- कायमस्वरूपी नोकरी देण्याचे आमिष दाखवून एका २२ वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. या प्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका गावातील २२ वर्षीय महिला (नाव व गाव गोपनीय) हिला आरोपी तरुणाने कायमस्वरूपी काम मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर दि. ३१ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास तिला मोटारसायकलवर बसवून एका मोकळ्या पटांगणात नेले. तेथे अंधाराचा फायदा घेत आरोपीने तिला धमकावून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. घटनेनंतर आरोपीने कोणालाही याबाबत माहिती देऊ नकोस, मी तुझा कायमस्वरूपी सांभाळ करतो, असे सांगून पीडितेला मोटारसायकलवरून रस्त्यावर सोडून तेथून निघून गेला, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

## दाम्पत्याच्या गळ्यातील सोन्याचे गंठण हिसकावले

**धाराशिव** :- धाराशिव शहरात मध्यरात्री गाडीत झोपलेल्या दाम्पत्याला लक्ष्य करत अज्ञात चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण हिसकावून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शाहनवाझ चॉदमिया शेख (वय 54, रा. अहमदनगर) हे दिनांक 2 जून 2026 रोजी पहाटे 12.45 वाजण्याच्या सुमारास गोकर्ण पेट्रोलपंपाजवळील आर्यन हॉटेलसमोरील मोकळ्या जागेत आपली गाडी उभी करून पत्नीसह झोपले होते. यावेळी गाडीची एक काच अर्धवट उघडी असल्याचा फायदा घेत अज्ञात दोन व्यक्तींनी गाडीत हात घालून फिर्यादी यांच्या पत्नीच्या गळ्यातील सुमारे 15 ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण जबरदस्तीने हिसकावून नेले.

**आरंभ मराठी** | आरोग्य, पर्यावरण आणि बचतीसाठी सायकल संस्कृती पुनरुज्जीवनाची गरज

# महागाईच्या झळा आणि इंधन खर्चामुळे नागरिकांचा पुन्हा सायकलकडे कल

**नसरोद्दीन फकीर । आरंभ मराठी**

**उमरगा - वाढती महागाई, इंधनाचे वाढते दर आणि दैनंदिन खर्चाचा वाढलेला ताण यामुळे उमरगा शहरासह तालुक्यातील अनेक नागरिक पुन्हा सायकलचा पर्याय स्वीकारताना दिसत आहेत. एकेकाळी सर्वसामान्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग असलेली सायकल आधुनिक वाहतुकीच्या साधनांच्या गर्दीत मागे पडली होती; मात्र सध्याच्या आर्थिक परिस्थितीत तिचे महत्त्व पुन्हा अधोरेखित होत आहे.**

पूर्वी गावोगावी सायकल हेच प्रमुख दळणवळणाचे साधन होते. शाळा, बाजारपेठ, शेत आणि विविध कामांसाठी नागरिक मोठ्या प्रमाणावर सायकलचा वापर करत होते. अनेक ठिकाणी सायकली भाड्यानेही उपलब्ध होत असत. मात्र वाढते शहरीकरण, मोटारसायकली आणि चारचाकी वाहनांची वाढलेली उपलब्धता, बदलती जीवनशैली आणि प्रतिष्ठेच्या संकल्पनांमुळे सायकल संस्कृती हळूहळू लोप पावत गेली. परिणामी वाहनांची संख्या वाढून वायू व ध्वनी प्रदूषणात मोठी भर पडली. आज अनेक तरुणांकडे लाखो रुपयांच्या बाईक आहेत; मात्र वाढत्या इंधन खर्चामुळे त्यांच्यासमोरही खर्चाचे गणित बिघडत आहे. उमरगा शहरातील ज्येष्ठ व्यावसायिक मल्लीनाथ बुक्का यांनी १९८४ साली सायकलींचे दुकान सुरू केले. त्यांच्या मते, त्या काळात एटलस आणि हिरो या कंपन्यांच्या सायकलींची मोठी मागणी होती. विशेषतः मराठवाड्यात एटलस सायकल लोकप्रिय होती. शहरात सायकली भाड्याने देण्याची प्रथा होती. एका तासासाठी एक रुपया, दिवसभरासाठी आठ रुपये आणि रात्री मुक्कामासाठी दहा रुपये असा दर आकारला जात असे. ग्रामीण भागातील मजूर शहरात कामासाठी तर व्यापारी ग्रामीण भागात वस्तू विक्रीसाठी सायकलवरून प्रवास करत असत. २००८-०९ नंतर सायकल भाड्याने देण्याची परंपरा जवळपास बंद झाली. उमरगा शहरात २०१० पूर्वी इंदिरा चौक, मोमीन गल्ली, शिवाजी चौक, मार्केट मस्जिद, आरोग्य नगर, जुना हैदराबाद नाका, श्रीराम मंगल कार्यालय परिसर आणि इतर भागांत मिळून सायकलींची सुमारे अकरा दुकाने होती. सध्या त्यापैकी केवळ चार दुकाने सुरू असल्याचे दिसून येते. पूर्वी सायकल हे सर्वसामान्यांचे मुख्य वाहतुकीचे साधन होते. आज मात्र तिचा वापर प्रामुख्याने लहान मुलांच्या खेळापुरता मर्यादित झाल्याचे चित्र आहे. नियमित सायकल चालवल्याने हृदयाचे आरोग्य सुधारते, शरीर तंदुरुस्त राहते, लठ्ठपणा कमी होतो आणि मानसिक तणाव दूर होण्यास मदत होते. याशिवाय इंधनाची बचत, वाहतूक कोंडी कमी होणे आणि प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यासाठीही सायकल प्रभावी माध्यम ठरते. आजच्या काळात वाढती महागाई, पर्यावरणीय आव्हाने आणि आरोग्याच्या समस्या लक्षात घेता सायकलचा वापर वाढविणे ही काळाची गरज बनली आहे. सायकल ही केवळ वाहतुकीचे साधन नसून आरोग्यदायी जीवनशैली, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासाचा प्रभावी मार्ग आहे.




### पुन्हा सायकलचे दिवस येणार

पूर्वीच्या काळात जिल्हा परिषद शाळेचे गुरूजी, गावचे पोलिस पाटील, सधन शेतकरी, सरपंच या मोजक्या वर्गाकडे सायकल असायची, वाढत्या महागाईमुळे व इंधन कमतरतेमुळे पुन्हा सर्व जनता सायकलीकडे वळल्याचे दिसत आहे.

**मल्लीनाथ बुक्का,**
**सायकल दुकानदार, उमरगा.**

### सायकल आरोग्यासाठी उपयुक्त

सायकल हे एक पर्यावरणपूरक, किफायतशीर आणि आरोग्यदायी वाहतुकीचे साधन आहे. सायकल चालवल्यामुळे शरीराचा व्यायाम होतो, हृदय मजबूत राहते आणि शारीरिक तंदुरुस्ती वाढते. इंधनाची गरज नसल्याने खर्च कमी होतो तसेच वायू व ध्वनी प्रदूषणही कमी होते.

**अनिल मदनसुरे,**
**सायकलपटू, उमरगा.**





### इंधन संकटावर सायकल प्रभावी उपाय

वाढत्या इंधन दरांमुळे आणि इंधन संकटामुळे सायकल हा एक उत्तम पर्याय ठरत आहे. सायकलमुळे इंधनाची बचत होते, पर्यावरणाचे संरक्षण होते आणि आरोग्यही चांगले राहते. दैनंदिन छोट्या अंतराच्या प्रवासासाठी सायकलचा वापर केल्यास खर्च कमी होऊन प्रदूषणही घटते. त्यामुळे इंधन संकटावर सायकल हा प्रभावी आणि शाश्वत उपाय आहे.

**डॉ प्रशांत मोरे, सायकलपटू**
**(बालरोगतज्ञ, उमरगा.)**

# कर्जमाफीच्या नावाखाली कर्जवसुलीचा डाव; सरकारचे धोरण शेतकरीविरोधी

## कर्ज माफीच्या धोरणावर आमदार कैलास पाटील यांची सडकून टीका

**आरंभ मराठी । धाराशिव**

दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर करून सरकार शेतकऱ्यांची दिशाभूल करत असल्याचा आरोप आमदार कैलास पाटील यांनी केला आहे. कर्जमाफीचा गाजावाजा एकीकडे आणि दुसरीकडे आधी कर्ज भरा, मगच लाभ घ्या अशी अट लादून सरकारने कर्जमाफीचेच रूपांतर कर्जवसुली मोहिमेत केल्याची टीका त्यांनी केली.सोशल मीडियावरील पोस्टमध्ये आमदार पाटील यांनी म्हटले आहे की, २०१९ मध्ये कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या ३२ लाखांहून अधिक शेतकऱ्यांसाठी ५० हजार रुपयांची मर्यादा घालण्यात आली आहे. ज्यांची थकबाकी ५० हजार रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांनी आधी उर्वरित रक्कम भरावी आणि त्यानंतरच लाभ मिळेल, अशी अट सरकारने घातली आहे.वास्तविक पाहता ज्या शेतकऱ्याकडे कर्ज फेडण्यासाठी पैसे आहेत त्याला कर्जमाफीची गरजच काय आणि ज्याच्याकडे पैसे नाहीत त्याने आधी कर्ज भरायचे कसे ?, असा सवाल करत हा निर्णय म्हणजे बुडणाऱ्याच्या गळ्यात दगड बांधून त्यालाच पोहायला सांगण्यासारखा असल्याचे पाटील यांनी म्हटले आहे. राज्यातील बहुतांश शेतकऱ्यांचे पीककर्ज



एक लाख रुपयांहून अधिक असताना आधी ५० हजार भरा, मग ५० हजार मिळवा, ही भूमिका म्हणजे कर्जमाफी नसून सरळ कर्जवसुली असल्याचा आरोप त्यांनी केला. या योजनेला कर्जमाफी म्हणणे म्हणजे शब्दांचाही अपमान असल्याचे ते म्हणाले. महाविकास आघाडी सरकारने २०१९ मध्ये कोणत्याही अटी-शर्तींशिवाय सरसकट कर्जमाफी दिली होती. मात्र सध्याचे सरकार पुन्हा एकदा अटी-शर्तींचे जाळे उभे करून शेतकऱ्यांची फसवणूक करत असल्याची टीकाही त्यांनी केली.कर्जमाफीवरील सर्व अटी तत्काळ रद्द करून पात्र शेतकऱ्यांना प्रत्यक्ष आणि सन्मानजनक लाभ देणारी सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, अन्यथा शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी, असा इशाराही आमदार कैलास पाटील यांनी सरकारला दिला.

# विषारी दारूचे बळी का वाढत आहेत?



नुकतेच मे महिन्याच्या शेवटच्या दिवशी पुणे चिंचवड मधील फुगेवाडी परिसरात विषारी दारू प्यायल्याने १९ जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. महसूल उत्पन्नाला हपापलेल्या राज्य सरकारला यामुळे काहीसे हादरे मिळाले. दारूमुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांचा हा आकडा कदाचित पुढेही जाऊ शकतो. त्यानंतर लगेच हडपसर येथेही विषारी दारू प्यायल्याने सहा जणांचा मृत्यू झाला आणि सुस्त झालेली शासकीय यंत्रणा पुन्हा कामाला लागली. कुठे काही दुर्घटना झाली की लगेच त्यात मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसांना शासकीय मदत जाहीर करून आपली जबाबदारी झटकणारे शासन याहीवेळी मृतकांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाखांची मदत जाहीर करून मोकळे झाले. हा पायंडा पाडल्याने यापुढे प्रत्येक राज्य अशा दारूमुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांचा वारसांना पैसे देतील, यात नवल नाही. म्हणजे प्या...मरा आणि घरच्यांना सुखी करा असेच म्हणावे लागेल. पुण्यातील या विषारी दारू प्रकरणी काही लोकांना आता अटक करण्यात आल्याचे वृत्त आहे. वास्तविक या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन यात कोण कोण सहभागी आहे, याचा शोध घेणे आणि त्यांच्यावर कठोर कारवाई करणे कमप्राप्त आहे. पण, नेहमीप्रमाणे संथगतीने चालणारा तपास आरोपींना जामीन मिळवून देण्यास सहाय्यक ठरेल. पुन्हा आरोपी बाहेर येऊन आपली मृत्यूची दुकाने थाटण्यास सज्ज होतील आणि पुन्हा कुठल्या ठिकाणी विषारी दारू पिऊन नवे मृत्यू होतील. पुन्हा शासकीय मदत जाहीर केल्या जाईल. हे असेच चालणार. वास्तविक दारू पिणाऱ्यांच्या कुटुंबाची काय अवस्था असते हे सर्वांनाच ठाऊक आहे. पण, दारू पिऊन मरणाऱ्यांना शासकीय मदत देण्यापेक्षा आणि सरकारी तिजोरी अशी खाली करण्यापेक्षा दारूची अवैध दुकाने, हातभट्टी, दारूच्या कंपन्याच बंद करणे योग्य नाही राहणार काय? दारूतून महसूल मिळतो आणि प्रसंगी निवडणूक सुद्धा जिंकता येते हे बरोबर असले तरी, या दारूमुळे विविध आजार झाल्यावर शासकीय रुग्णालयांत यांच्यावर उपचारासाठी सरकार अवाढव्य खर्च करते. मग, कुठले आले उत्पन्न? या दारू कंपन्या बंद करायच्या नाहीत ही सरकारची मानसिकता आहे की राजकीय लोकांच्याच दारूच्या कंपन्या आहेत? हा घोळ सर्वसामान्य माणसाला मात्र सोडवता येणारा नाही. आता पुन्हा अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे तालुक्यातील गौरखेडा येथे सुद्धा विषारी दारू प्यायल्याने तीन जणांची प्रकृती बिघडली असल्याची घटना उघडकीस आली आहे. २०२३ च्या मे महिन्यात तामिळनाडू राज्यात सुद्धा अशीच एक घटना घडली होती. तामिळनाडूच्या विल्लुपरम आणि चेंगलपट्टू जिल्ह्यात विषारी दारूने १० जणांचा बळी घेतला होता. त्यात महिलांचाही सहभाग होता. त्याच तामिळनाडू राज्यात २०२४ च्या जूनमध्ये विषारी दारूमुळे पुन्हा ३४ जणांचा मृत्यू झाला होता. कल्लाकुरीची येथे ही घटना घडली होती. आता मात्र तामिळनाडूचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री विजय यांनी राज्यातील ७१७ सरकारी किरकोळ मद्यविक्री दुकाने बंद करण्याचे आदेश देऊन, काही प्रमाणात मद्य विक्रीवर प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न केला आहे. छत्तीसगढच्या बिलासपूरमध्ये २०२५ च्या फेब्रुवारी महिन्यात विषारी दारूमुळे सात जणांचा झालेला मृत्यूही असाच. अशा काही घटना घडल्या की त्याचं खापर अपुऱ्या पोलिस बळावर फोडले जाते. मात्र, दारू बनविणाऱ्या कंपन्या आम्ही रोजगार देतो म्हणून सर्रास आपले उत्पादन सुरू ठेवतात. याच कंपन्यांनी फळांचा शुद्ध रस, दुग्धजन्य पदार्थ बनविण्याच्या कंपन्या टाकून रोजगार दिल्यास योग्य नाही राहणार काय? पण, आम्हाला विषातून, लोकांचे कुटुंब उद्ध्वस्त करून पैसा कमवायचा असतो, ही बाब या कंपन्या आणि सरकार सुद्धा दडवून ठेवते, असे खेदाने म्हणावे लागते. नुसत्या नागपूरचाच विचार करतो म्हटले तर जानेवारी २०२५ मधील एका रिपोर्टनुसार नागपूरकर २ कोटी ८ लाख रुपयांची तब्बल १,६२,२८० लिटर दारू दिवसाला रिचवतात. ही आकडेवारी डोळे दिपवणारी असली तरी, यात सत्यता आहे. विशेष म्हणजे या आकडेवारीत देशी दारूचे प्रमाण ७३,७०४ लिटर इतके आहे आणि ही देशी दारू रिचविणारे गरीब कुटुंबातील असते ( रिक्षा चालक, मजूर वगैरे ) हे नव्याने सांगणे नाही. सरासरी काढतो म्हटले तर राज्यात दररोज ३० लाख लिटर दारूचा महापूर वाहतो, असेच म्हटल्या जाऊ शकते. जर, राज्यात दररोज इतक्या मोठ्या प्रमाणात दारू विक्री होत असेल तर याच्या दुष्परिणामांनी मरणाऱ्यांवर किंवा विविध आजार ( यकृताचे आजार, कर्करोग आदी ) लागण ( झाल्यानंतर, अपघात घडल्यावर सरकार अशांवर किती मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करत असेल, याची आकडेवारी मात्र कधीच पुढे येत नाही. खुद्द २०२४ च्या लोकसभा निवडणुक वर्षात महाराष्ट्रातील लाखो मद्यपींनी तब्बल ७२ कोटी ७० लाख लिटर देशी- विदेशी मद्य आणि बियर रिचवल्याची आकडेवारी समोर आली होती. जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केलेल्या एका आकडेवारीनुसार जगात होणाऱ्या एकूण मृत्यूंपैकी ४.७ टक्के मृत्यू हे दारूमुळे होतात. दारूचे व्यसन दरवर्षी २६ लाख लोकांना मृत्यूच्या खाईत लोटते, असे यात म्हटल्या गेले आहे. २०१५ मध्ये राज्यातील मालाड मालवणी परिसरात नित्कृष्ट दर्जाची दारू प्यायल्याने तब्बल १०६ जणांचा मृत्यू झाला होता तर काहींना अंधत्व आले होते. या घटनेतून बोध घेऊन राज्यात सरसकट दारूबंदी झाली असती तर फुगेवाडीची घटना घडलीच नसती. मात्र, उत्पादन शुल्कातून पैसा कमविणाऱ्या सरकारला लोकांच्या जीवाचे काय मोल? २०२४ च्या ऑक्टोबर महिन्यात बिहारच्या १६ गावांमध्ये विषारी दारूमुळे ४१ जणांचा मृत्यू झाल्याची घटना जनमनाला विचलित करणारी होती. त्याचीच पुनरावृत्ती पुढे २०२६ च्या एप्रिल महिन्यात होऊन बिहारच्या चंपारण जिल्ह्यात या विषारी दारूने ४ जणांचा बळी घेतला होता. तर, मोतीहारी जिल्ह्यात ११ जणांचा बळी याच महिन्यात घेतला होता. मात्र, इतर घटनांसारखी ही घटनाही सर्वांच्या आठवणींतून हद्दपार झाली आणि पुन्हा पुन्हा दारू पिऊन मरणाऱ्यांच्या घटना घडायला लागल्या. हल्ली स्टेट्स सिम्बॉल समजल्या जाणाऱ्या मद्यपानाचा संबंध मानवी शरीरातील तब्बल ६२ आजारांशी जुळला असल्याचे ॲडीक्शन या वैद्यकीय नियतकालिकात सादर झालेल्या शोधनिबंधात म्हटल्या गेले आहे. असे असतांना जाणीवपूर्वक जर काही लोकं मद्यपानाकडे वळून आपला जीव गमावत असेल तर, पर्याय नाही. मात्र, संतांच्या भूमीत वाढते मद्यपी आणि त्यातून मरणाऱ्यांची वाढती संख्या खरेच चिंताजनक आहे.

**लीलाधर दवंडे**
कामठी ( नागपूर )
८४१२८७७२२०

# विनोदाचा सम्राट अशोक

**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५





मराठी चित्रपट सृष्टीतील जेष्ठ विनोदी अभिनेते, विनोद सम्राट, चित्रपट सृष्टीचे मामा, पद्मश्री अशोक सराफ यांचा आज ७९ वा वाढदिवस. विनोदाचा हा सम्राट बघता बघता ७९ वर्षाचा झाला यावर रसिकांचा विश्वास बसणे कठीण असले तरी ते सत्य आहे. अशोक सराफ यांचा जन्म ४ जून १९४७ रोजी मुंबईत झाला. मूळचे बेळगावचे असणारे अशोक सराफ यांचे बालपण मुंबईतील चिखलवाडी भागात गेले. त्यांचे शिक्षण मुंबईतील डि. जि. टी विद्यालयात झाले. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी ययाती आणि देवयानी या नाटकात विदुषकाची भूमिका साकारली होती. दादा कोंडके यांच्या पांडू हवालदार या चित्रपटाद्वारे त्यांनी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. या चित्रपटातील त्यांनी साकारलेली इरसाल हवालदाराची भूमिका खूप गाजली. दादा कोंडके यांच्याच राम राम गंगाराम या चित्रपटात त्यांनी म्हमद्या खाटीक ही भूमिका साकारली. कारकिर्दीच्या सुरवातीलाच केलेल्या विनोदी भूमिका लोकप्रिय ठरल्याने त्यांना विनोदी भूमिकाच मिळत गेल्या आणि त्यांनीही त्या भूमिकांना न्याय देऊन प्रेक्षकांना खळखळून हसवले. ८० च्या दशकात लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या समवेत त्यांची जोडी जमली. पडद्यावरील अशोक सराफ आणि लक्ष्या या जोडीने मराठी चित्रपटसृष्टित अक्षरशः धुमाकूळ घातला. या दोघांनी एकत्र अभिनय केलेल्या अशी ही बनवाबनवी, धुमधडाका, दे दणादण यासारख्या चित्रपटांनी धमाल उडवून दिली. सचिन आणि महेश कोठारे या दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेले व अशोक सराफ यांनी अभिनय केलेले नवरी मिळे नवऱ्याला, आत्मविश्वास, गंमत जंमत, आयत्या घरात घरोबा शुभ मंगल सावधान, आई नंबर वन, एक शेर दुसरी सव्वाशेर , नवरा पावशेर, नवसाचा नवरा, आयडीयाची कल्पना हे चित्रपट देखील लोकप्रिय झाले. अशोक सराफ यांनी केवळ विनोदी भूमिकाच केल्या असे नाही तर काही गंभीर भूमिका देखील केल्या. वजीर चित्रपटात त्यांनी साकारलेला गंभीर राजकारणी भाव खाऊन गेला तर चौकट राजा चित्रपटातील त्यांनी साकारलेली सहृदय व्यक्तीची भूमिका लोकांच्या मनात घर करून गेली. अशोक सराफ यांनी अभिनय केलेले आई नंबर वन, आत्मविश्वास, नवरी मिळे नवऱ्याला, धुमधडाका, गंमत जंमत, माझा पती करोडपती, दे दणादण, एक डाव भुताचा, भुताचा भाऊ, शेजारी शेजारी, एक उनाड दिवस, अफलातून, गोंधळात गोंधळ, अशी ही बनवाबनवी, सगळीकडे बोंबाबोंब, आयत्या घरात घरोबा, कुंकू, घनचक्कर, वजीर, एकापेक्षा एक, अनपेक्षित, चंगू मंगू , शुभमंगल सावधान, आमच्या सारखे आम्हीच, बाळाचे बाप ब्रह्मचारी, प्रेम करूया खुल्लम खुल्ला, गोष्ट धमाल नाम्याची, पांडू हवालदार, राम राम गंगाराम, कळत नकळत, अरे संसार संसार, आपली माणसं, एक डाव धोबीपछाड, आयडीयाची कल्पना, साडे माडे तीन हे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट विशेष गाजले. त्यांनी केवळ मराठीच नाही तर हिंदी चित्रपटातही काम केले. करण अर्जुन, कुछ तुम कहो कुछ हम कहे, बडे घर की बेटी, बेटी नंबर वन, कोयला, गुप्त , संगदिल सनम, प्यार किया तो डरणा क्या?, जोरू का गुलाम, खूबसुरत, यस बॉस, सिंघम या हिंदी चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका विशेष लक्षात राहण्यासारख्या आहेत. हम पांच, टना टन टन, डोन्ट वरी, हो जायेगा, छोटी बडी बाते यासारख्या काही टीव्ही मालिका देखील त्यांनी केल्या. त्यांनी भूमिका केलेले हमीदा बाईची कोठी, अनधिकृत मनोमिलन, हे राम, कार्डिओग्राम, सारखं छातीत दुखतंय ही नाटकेही खूप गाजली. चित्रपट, टीव्ही, रंगमंच अशा तिन्हीं माध्यमातून त्यांनी आपल्या अभिनयाची मुशाफिरी केली. आपल्या कारकिर्दीत त्यांनी २०० हुन अधिक चित्रपटात भूमीका केल्या. रंजना, उमा भेंडे, प्रेमा किरण, निवेदिता जोशी, वर्षा उसगावकर, अश्विनी भावे, अलका कुबल, प्रिया बेर्डे, किशोरी शहाणे या आणि अशा अनेक अभिनेत्रींसोबत त्यांनी भूमिका केल्या. विशेष म्हणजे या सर्व अभिनेत्री त्यांना सेटवर मामा म्हणत. आज तर ते संपूर्ण चित्रपट सृष्टीचे मामा झाले आहेत. आज त्यांना अशोक मामा याच नावानेच ओळखले जाते. अशोक सराफ यांना अशोक मामा हे नाव कसे पडले हे पाहणे देखील रंजक आहे. एका चित्रपटाच्या सेटवर प्रकाश शिंदे नावाच्या कॅमेरामन सोबत त्यांची मुलगी येत असत. सेटवर आली की ती विचारत असे, हे कोण ? त्या कॅमेरामनने सांगितले हे अशोक सराफ पण तू यांना मामा म्हणायचे. त्या मुलीसोबत सेटवरील सर्वजण त्यांना मामा म्हणू लागले पुढे हेच नाव रुढ झाले आणि अशोक सराफचे अशोक मामा बनले. अशोक सराफ यांना मागीलवर्षी पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांनी त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान केला. अशोक मामांना पद्मश्री पुरस्कार मिळाल्यावर संपूर्ण महाराष्ट्रात आनंदोत्सव साजरा करण्यात आला होता. जगभरातील मराठी माणसांनी त्यांना पद्मश्री मिळाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या होत्या. अशोक मामांना अभिनयासाठी मिळालेला हा पहिला पुरस्कार नाही. याआधीही त्यांच्या अभिनयासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत मात्र ते नेहमी म्हणतात की प्रेक्षकांच्या मनात मी स्थान निर्माण करू शकलो हाच माझ्यासाठी सर्वोत्तम पुरस्कार आहे आणि ते सत्यही आहे. अशोक सराफ यांच्यावर मराठी प्रेक्षकांनी जितके प्रेम केले तितके कोणत्याच अभिनेत्यावर केले नसेल. जवळपास पाच दशके आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात आढळ स्थान निर्माण करून प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या या विनोदाच्या अभिनय सम्राटाला ७९ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! परमेश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना!! वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा अशोक मामा!!!

# पैशांचा माज, न्यायव्यवस्थेची खिल्ली आणि माणुसकीचा पराभव

सध्या समाजमाध्यमांवर एका तथाकथित 'हायफाय' पार्टीची चित्रफीत मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. अनेक वृत्तवाहिन्यांनीही ती दाखवत त्यावर चर्चा घडवून आणली. या चित्रफितीत एक उच्चभ्रू कुटुंब आपल्या नातेवाईक आणि मित्रमंडळींसह डीजेच्या तालावर बेभान होऊन नाचताना दिसते. ही चित्रफीत पाहताना अनेकांच्या मनात प्रश्न निर्माण होतात — या कुटुंबाने एखादा मोठा उद्योग सुरू केला आहे का? एखादा पराक्रम गाजवला आहे का? की कुटुंबातील कुणी राष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले आहे? परंतु वास्तव याहून भयावह आहे. ही पार्टी कोणत्याही यशाचा उत्सव नसून, पैशांच्या माजात कायदा, प्रशासन आणि समाजाच्या भावनांवर केलेला निर्लज्ज नाच असल्याचे दिसून येते. या चित्रफितीत दिसणारे लोक म्हणजे पुण्यातील गाजलेल्या 'पोर्शे कार अपघात प्रकरणा'तील मुख्य आरोपी बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल आणि त्याचे कुटुंबीय असल्याचे सांगितले जात आहे. गळ्यात नोटांचे हार घालून 'बंबई से आया मेरा दोस्त' या गाण्यावर नाचणाऱ्या या लोकांना किमान माणुसकीची तरी जाणीव आहे का? असा संतप्त प्रश्न सामान्य नागरिकांच्या मनात निर्माण होतो.१९ मे २०२४ रोजी पुण्यातील कल्याणीनगर भागात मध्यरात्रीच्या सुमारास ताशी १६० किलोमीटर वेगाने धावणाऱ्या पोर्शे कारने दुचाकीला जोरदार धडक दिली होती. या भीषण अपघातात आयटी अभियंते अनिष अवधिया आणि अश्विनी कोष्टा या दोघांचा जागीच मृत्यू झाला होता. तपासात ही कार १७ वर्षीय वेदांत अग्रवाल चालवत असल्याचे समोर आले. तो मद्यधुंद अवस्थेत असल्याचेही निष्पन्न झाले. धक्कादायक बाब म्हणजे, त्या आलिशान गाडीची नोंदणीही झालेली नव्हती. या प्रकरणाने संपूर्ण देश हादरला होता. सुरुवातीला पोलिसांवर दबाव आणण्याचे प्रयत्न झाल्याच्या चर्चाही रंगल्या. आरोपी अल्पवयीन असल्याने न्यायालयाने त्याला 'सडक दुर्घटना' या विषयावर ३०० शब्दांचा निबंध लिहिण्याची शिक्षा देत अवघ्या काही तासांत जामीन मंजूर केला होता. या निर्णयानंतर समाजात तीव्र संताप उसळला होता. जनतेच्या दबावानंतर पोलिसांनी आरोपीवर प्रौढ म्हणून खटला चालवण्याची मागणी केली. मात्र न्यायालयाने ती फेटाळून लावत त्याला बालसुधारगृहात पाठवले. नंतर त्यालाही जामीन मिळाला. दरम्यान, रक्ताचे नमुने बदलल्याप्रकरणी आणि पुरावे नष्ट करण्याच्या आरोपांत आरोपीच्या आई-वडिलांसह आजोबांवरही कारवाई झाली. विशाल अग्रवालला मागील महिन्यात काही अटींसह जामीन मंजूर झाला. त्यानंतरच ही कथित 'जंगी पार्टी' झाल्याचे बोलले जात आहे. चित्रफीत व्हायरल झाल्यानंतर मात्र अग्रवाल कुटुंबीयांनी ही पार्टी सप्टेंबर २०२३ मधील लग्नाच्या वाढदिवसाची असल्याचा दावा केला. परंतु हा व्हिडिओ नेमका जामीनानंतरच बाहेर का आला? हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. खरा मुद्दा हा आहे की, दोन निष्पाप जीव गमावलेल्या कुटुंबीयांच्या वेदनांचा विचार न करता अशा प्रकारे जल्लोष करणे ही अत्यंत अमानुष बाब आहे. आपल्या अल्पवयीन मुलाला महागडी, नोंदणी नसलेली कार देणे, त्याच्या वर्तनाकडे दुर्लक्ष करणे आणि नंतर त्याला वाचवण्यासाठी सर्व यंत्रणा वापरणे — या सर्व गोष्टी समाजाला चुकीचा संदेश देणाऱ्या आहेत.या संपूर्ण प्रकरणातून पैशांच्या जोरावर कायद्यालाही वाकवता येते, अशी भावना जनमानसात अधिक बळकट होताना दिसते. गरीब माणूस वर्षानुवर्षे न्यायालयाच्या तारखा पाळत राहतो, तर श्रीमंतांना झटपट जामीन आणि सवलती मिळतात, अशी भावना सर्वसामान्यांमध्ये निर्माण झाली आहे. देशातील अनेक तुरुंगांत हजारो कच्चे कैदी वर्षानुवर्षे अडकून पडले आहेत. कारण त्यांच्याकडे सक्षम वकील किंवा जामिनासाठी पैसा नाही. त्यामुळे न्यायव्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत असल्याचे चित्र आहे. या घटनेमुळे समाजात कठोर शिक्षेची मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे. 'जान के बदले जान' अशा कठोर शिक्षांची भावना सामान्यांच्या मनात का निर्माण होते, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.एकंदरीत, या प्रकरणाने पुन्हा एकदा कायदा, न्यायव्यवस्था आणि समाजातील आर्थिक विषमता यावर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. 'सुंभ जळाला पण पीळ गेला नाही' अशीच अवस्था या माजोरड्या मानसिकतेची दिसते. त्यामुळे विशाल अग्रवालचा जामीन रद्द करून त्याच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पीडित कुटुंबीय आणि सर्वसामान्य नागरिकांकडून होत आहे. आता तरी प्रशासन आणि न्यायव्यवस्था ठोस भूमिका घेणार का? हाच खरा कळीचा मुद्दा आहे.

**प्रदीप व्ही. खोलमकर**
नाशिक
मोबा. : ८७६७५९२९८०

# माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त येणेगूर येथील आरोग्य शिबिरात 220 रुग्णांची तपासणी

**आरंभ मराठी । येणेगूर**

महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त उमरगा तालुक्यातील येणेगूर येथील हनुमान मंदिर, अशोकनगर परिसरात मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, नेरुळ (नवी मुंबई) आणि ज्ञानज्योती फाऊंडेशन, उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरामध्ये येणेगूर व परिसरातील सर्व वयोगटातील 220 हून अधिक महिला, पुरुष आणि बालकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. मुंबई येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने हृदयरोग,



स्त्रीरोग, कान-नाक-घसा, नेत्ररोग, बालरोग, अस्थिरोग आदी विविध आजारांची तपासणी करून आवश्यक उपचार व मोफत औषधांचे वाटप केले. गंभीर आजार असलेल्या रुग्णांवर पुढील उपचार मुंबई येथे तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. तसेच ज्या नागरिकांकडे आयुष्मान भारत योजनेचे आरोग्य कार्ड नव्हते, त्यांची मोफत ऑनलाइन नोंदणी करून त्यांना आरोग्य कार्ड उपलब्ध करून देण्यात आले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विवेकानंद हंगरगे, महादेव बिराजदार, सिद्धेश्वर उर्फ अप्पू हिप्परगे, गणेश बंडगर, पंडित संगशेट्टी यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

# स्व. गोपीनाथ मुंडे यांना स्मृतिदिनी परंडा भाजपाकडून अभिवादन

**आरंभ मराठी । परंडा**

जनसामान्यांचे आधारस्तंभ, माजी केंद्रीय मंत्री तथा लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने परंडा येथील संपर्क कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजपा नेते तथा माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते स्व. मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष अरविंदबप्पा रगडे, जिल्हा सरचिटणीस ॲड. गणेश खरसडे, परंडा नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष समरजीतसिंह ठाकूर, शहराध्यक्ष उमाकांत गोरे, तालुका उपाध्यक्ष डॉ. अमोल गोफणे, हरी शिंदे, जयदेव गोफणे, विकास कुलकर्णी,



धनाजी गायकवाड, अमोल केमदारणे, ॲड. जहीर चौधरी, साहेबराव पाडुळे, निशिकांत क्षिरसागर, बाळासाहेब गिरी, नागेश गर्जे, नागेश शिंदे, तानाजी घोडके, प्रा. विलास गायकवाड, शिवाजीराव पाटील, श्रीकृष्ण शिंदे, तुषार नेटके, रामदास गुडे, सुजित परदेशी, जयंत सायकर, योगेश डांगे, अभिषेक चोबे, रामेश्वर चोबे, रवीकुमार गरड, शहर सरचिटणीस धनंजय काळे, तुषार कोळेकर, समाधान कोळेकर, सुखदेव इंगळे, संपत्ती भोळे, गणेश होरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
» पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,विबग्योर स्कुलशेजारी » कोल्हापूर कार्यालयः रिव्हॉल्युशन, दुसरा मजला, दाभोळकर कॉर्नर, स्टेशन रोड, करवीर.

# स्वच्छतेचे टेंडर रखडल्याने भूम शहराची स्वच्छता व्यवस्था कोलमडली

## पावसाळ्यापूर्वी नाले तुंबले, घंटागाडी बंद; राजकीय वादात भूम शहरातील नागरिक वेठीस

सचिन बारगजे । आरंभ मराठी

**भूम : भूम नगरपालिकेच्या स्वच्छता विभागाचे नवीन टेंडर अद्याप मंजूर न झाल्याने शहरातील स्वच्छता व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली असून नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. घरगुती कचरा संकलनासाठीची घंटागाडी सेवा अनेक भागांत बंद पडल्याने नागरिकांसमोर कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान, पावसाळा तोंडावर असताना नाले आणि गटारींची साफसफाईही रखडल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.**





भूम शहरातील अनेक भागांत नियमित कचरा संकलन होत नसल्याने नागरिक घरातच कचरा साठवून ठेवत आहेत. काही ठिकाणी रस्त्यांच्या कडेला, मोकळ्या जागांमध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकला जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे दुर्गंधी, अस्वच्छता आणि साथीच्या आजारांचा धोका वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नागरिकांच्या मते, शहराच्या विकासासाठी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींमधील राजकीय गटबाजी, परस्पर विरोध आणि वैयक्तिक मतभेद यामुळे अनेक प्रशासनिक निर्णय रखडले आहेत. शहराच्या मूलभूत प्रश्नांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी राजकीय संघर्षाला प्राधान्य दिले जात असल्याने त्याचा फटका थेट सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. विशेष म्हणजे, मान्सून अगदी काही दिवसांवर येऊन ठेपला असताना शहरातील नाले, गटारी आणि पावसाच्या पाण्याचा निचरा करणाऱ्या वाहिन्यांची अपेक्षित साफसफाई झालेली नाही. अनेक ठिकाणी गाळ, प्लास्टिक व कचरा साचलेला असल्याने पावसाचे पाणी वाहून जाण्यास अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पहिल्याच जोरदार पावसात शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठा आणि निवासी भागांमध्ये पाणी तुंबण्याची भीती नागरिक व्यक्त करीत आहेत. व्यापारी, महिला आणि ज्येष्ठ नागरिक वर्गातूनही प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. शहराचा विकास आणि मूलभूत सुविधा सुधारण्यासाठी आम्ही प्रतिनिधींना निवडून दिले; मात्र आज स्वच्छता व्यवस्थाच कोलमडली आहे. राजकीय मतभेदांमध्ये शहराचा बळी दिला जात आहे, अशा संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहेत. स्वच्छ भारत अभियान, सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छ शहरांच्या संकल्पनांवर भर दिला जात असताना भूम शहरातील सद्यस्थिती मात्र चिंताजनक ठरत आहे. स्वच्छतेचे नवीन टेंडर तातडीने मंजूर करून घंटागाडी सेवा पूर्ववत सुरू करावी, तसेच पावसाळ्यापूर्वी नाल्यांची व्यापक साफसफाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. आता नगरपालिकेचे प्रशासन आणि लोकप्रतिनिधी राजकीय मतभेद बाजूला ठेवून शहरहितासाठी एकत्रितपणे काम करतात की नाही, याकडे संपूर्ण भूमकरांचे लक्ष लागले आहे. कारण स्वच्छता, आरोग्य आणि मूलभूत सुविधा या कोणत्याही राजकारणापेक्षा महत्त्वाच्या असून त्यावरच नागरिकांचे दैनंदिन जीवन अवलंबून आहे.

### शहरातील नागरिकांना वेठीस धरले आहे

मुख्याधिकारी उपस्थित नसल्याने सर्वसाधारण सभा रद्द करण्यात आली होती. मात्र त्यानंतर नगराध्यक्षांनी आपल्या व्हिटो हक्काचा वापर करून सर्वसाधारण सभा घेतली आणि विविध विषय चर्चेसाठी सभेपुढे ठेवले. असे असताना शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेला स्वच्छतेचे टेंडर काढण्याचा ठराव सभेत का घेण्यात आला नाही ? स्वच्छतेचा प्रश्न जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवून नगराध्यक्ष शहरातील नागरिकांना वेठीस धरण्याचे काम करीत आहेत. शहरातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी तातडीने टेंडर प्रक्रिया राबविण्यात यावी.

**रुपेश आप्पा शेंडगे**
**गटनेते, जनशक्ती नगर विकास आघाडी, भूम**

### आम्ही स्वतः घंटागाडी चालवण्यास तयार

मागील स्वच्छता टेंडरधारकाकडून मोठ्या प्रमाणात अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याची बाब आमच्या निदर्शनास आली आहे. यासंदर्भातील कागदपत्रांची मागणी करूनही नगरपालिका प्रशासनाकडून ती उपलब्ध करून दिली जात नाहीत. भ्रष्टाचाराची चौकशी होऊन सत्य समोर यावे, ही आमची भूमिका आहे. शहरवासीयांची गैरसोय होऊ नये म्हणून आम्ही स्वतः घंटागाडी चालवून स्वच्छता सेवा सुरू ठेवण्यास तयार आहोत; मात्र नगरपालिका प्रशासनाकडून घंटागाडीच्या चाव्याच दिल्या जात नाहीत. त्यामुळे शहरातील स्वच्छता व्यवस्थेची जबाबदारी नेमकी कोणाची, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

**अनिल शेंडगे**
**बांधकाम व स्वच्छता सभापती, नगर परिषद, भूम.**

### स्वच्छतेच्या टेंडरबाबत शहरवासीयांनी सत्य जाणून घ्यावे

फेब्रुवारी महिन्यात स्वच्छतेचे टेंडर मंजूर झाले असते, तर मार्चपर्यंत सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होऊन १ एप्रिलपासून शहरातील स्वच्छता सेवा नियमितपणे सुरू राहिली असती. मात्र जनशक्ती नगर विकास आघाडीच्या नगरसेवकांनी संबंधित ठरावास मंजुरी न दिल्यामुळे आज ही परिस्थिती ओढवली आहे. सध्या आचारसंहिता लागू असल्याने नवीन टेंडर प्रक्रिया राबविता येत नाही. आचारसंहिता संपल्यानंतर टेंडर काढून त्याची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी किमान एक ते दीड महिना लागणार आहे. त्यामुळे जुलै-ऑगस्ट महिन्यातच घंटागाडी सेवा नियमित सुरू होण्याची शक्यता आहे.

**सुरज गाढवे, गटनेते,**
**आलम प्रभू शहर विकास आघाडी, भूम.**

---

# पवनराजे निंबाळकर यांच्या कार्यस्मृतींना उजाळा



आरंभ मराठी । धाराशिव

कै. पवनराजे निंबाळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त धाराशिव येथील पवनराजे कॉम्प्लेक्समध्ये अभिवादन करण्यात आले. खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी पवनराजे निंबाळकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन केले. जनसामान्यांच्या मनात अढळ स्थान निर्माण करणारे पवनराजे निंबाळकर यांनी लोकसेवा, सामाजिक बांधिलकी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी केलेले कार्य आजही अनेक कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या कार्यस्मृतींना उजाळा देत उपस्थितांनी पवनराजे निंबाळकर यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा निर्धार व्यक्त केला.यावेळी पांडुरंग तात्या कुंभार, नानासाहेब पाटील, आतिश पाटील, काका शिनगारे, नगरसेवक नाना घाटगे, सुमित बागल, ओंकार नायगावकर, माजी नगरसेवक राणा बनसोडे, युवासेना जिल्हा संघटक अमित उंबरे, गणेश शिंदे, भारत शिंदे, कलीम कुरेशी, दत्ता टेकाळे, मोईन पठाण, मनोज पडवळ, सत्यजीत पडवळ, अजित बाकले, संदीप गायकवाड, पृथ्वीराज बाफना, नवज्योत शिंगाडे, पंकज स्वामी, नगरसेवक करवर, युवासेना शहरप्रमुख अभिराज कदम, नगरसेवक सिद्धेश्वर कोळी, राकेश कचरे, युवासेना उपजिल्हाप्रमुख निलेश शिंदे, प्रसाद राजेनिंबाळकर, गजानन नलावडे, प्रशांत जगताप, युवासेना उपतालुकाप्रमुख लखन देशमुख, अक्षय खळदकर, अक्षय मोरे यांच्यासह अनेक मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.

# हयातीचे प्रमाणपत्र आता घरबसल्या ऑनलाइन मिळणार

## तहसीलदार गोविंद येरमे यांचे लाभार्थ्यांना आवाहन

आरंभ मराठी । नारंगवाडी



शासनाच्या विविध सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी हयातीचे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तहसील कार्यालयात हेलपाटे मारण्याची गरज नसून, केंद्र शासनाने विकसित केलेल्या ऑनलाइन प्रणालीद्वारे ते घरबसल्या सादर करता येणार असल्याचे आवाहन तहसीलदार गोविंद येरमे यांनी केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना तसेच केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना या योजनांतील लाभार्थ्यांना या सुविधेचा लाभ होणार आहे. या योजनांमध्ये वृद्ध, निराधार महिला-पुरुष, विधवा, दुर्धर आजारग्रस्त व्यक्ती तसेच अनाथ मुला-मुलींचा समावेश आहे. यापूर्वी लाभार्थ्यांना दरवर्षी तहसील कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन हयातीचे प्रमाणपत्र सादर करावे लागत होते. त्यामुळे विशेषतः वृद्ध आणि आजारी लाभार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही समस्या दूर करण्यासाठी केंद्र शासनाने बी.एस.एल.ए.ई. (B.S.L.A.E.) ही ऑनलाइन प्रणाली विकसित केली आहे. या नव्या सुविधेनुसार लाभार्थी स्वतःच्या मोबाईलद्वारे किंवा नातेवाईकांच्या मदतीने हयातीचे प्रमाणपत्र ऑनलाइन सादर करू शकतात. तसेच ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक, सेतू सुविधा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र आणि नागरी सेवा केंद्र यांच्या माध्यमातूनही ही प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. तहसील प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, हयातीचे प्रमाणपत्र ऑनलाइन सादर झाल्यानंतर त्याची प्रत तहसील कार्यालयात जमा करण्याची आवश्यकता राहणार नाही. मात्र, विहित कालावधीत ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण न केल्यास संबंधित लाभार्थ्यांचा योजनेचा लाभ बंद होऊ शकतो. त्यामुळे सर्व पात्र लाभार्थ्यांनी वेळेत हयातीचे प्रमाणपत्र ऑनलाइन सादर करून प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन तहसीलदार गोविंद येरमे यांनी केले आहे.

# कै. पवनराजे निंबाळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त वृद्धाश्रमात अन्नदान



आरंभ मराठी । भूम

पवनराजे लोकसमृद्धी मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे प्रेरणास्थान असलेले दिवंगत कै. पवनराजे निंबाळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त नळे वडगाव येथील संत ज्ञानेश्वर वृद्धाश्रमात अन्नदानाचा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला. यावेळी कै. पवनराजे निंबाळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच उपस्थितांनी श्रद्धांजली वाहत त्यांच्या सामाजिक कार्याचा व समाजहितासाठी दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण स्मरण केला. समाजातील वंचित, गरजू आणि ज्येष्ठ नागरिकांप्रती असलेली त्यांची बांधिलकी जपत वृद्धाश्रमातील रहिवाशांना अन्नदान करण्यात आले. या कार्यक्रमास पवनराजे लोकसमृद्धी मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या भूम शाखेचे अधिकारी अमोल जामकर तसेच कर्मचारी संतोष क्षीरसागर, मुस्तकीम शेख, ओंकार झोरे आदी उपस्थित होते. उपस्थितांनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या गरजा जाणून घेतल्या व भविष्यातही सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली. कै. पवनराजे निंबाळकर यांच्या स्मृती जपण्यासाठी आणि त्यांच्या सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेण्यासाठी अशा सामाजिक उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सेवाभाव, कृतज्ञता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारा हा कार्यक्रम भावनिक वातावरणात संपन्न झाला.

---

दैनिक आरंभ मराठी | गवारे दाम्पत्य ठरले ग्रामीण युवकांसाठी प्रेरणास्थान

# नोकरीच्या मागे न धावता निवडला पोल्ट्रीचा मार्ग; गवारे दाम्पत्याची दीड महिन्यात लाखोंच्या उत्पन्नाकडे झेप

आरंभ मराठी । परंडा

ग्रामीण भागातील युवकांनी नोकरीच्या शोधात भटकण्याऐवजी स्वयंरोजगाराचा मार्ग स्वीकारल्यास आर्थिक प्रगती साधता येते, याचे प्रेरणादायी उदाहरण परंडा तालुक्यातील जवळा येथील रामा गवारे आणि त्यांच्या पत्नी स्नेहल गवारे यांनी घालून दिले आहे. पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत असतानाच त्यांनी शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पोल्ट्री व्यवसाय सुरू केला आणि आज त्यातून नियमित व समाधानकारक उत्पन्न मिळवत आहेत. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा व्यवसाय उभारण्याचा निर्णय रामा गवारे यांनी घेतला. सुरुवातीला कमी भांडवलात सुरू केलेल्या पोल्ट्री व्यवसायाने आज चांगले यश मिळवून दिले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, योग्य खाद्य व्यवस्थापन, वेळेवर लसीकरण आणि स्वच्छतेची काटेकोर अंमलबजावणी यामुळे त्यांच्या पोल्ट्रीतील उत्पादनात सातत्याने वाढ होत आहे. सध्या एका खाजगी कंपनीच्या माध्यमातून त्यांच्या पोल्ट्रीमध्ये चार हजार बॉयलर कोंबड्यांचे संगोपन केले जाते. या व्यवसायातून अवघ्या ४५ दिवसांच्या कालावधीत सुमारे ९० हजार ते १ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळत असल्याने गवारे दाम्पत्याने आर्थिक स्थैर्य मिळवले आहे. पोल्ट्री व्यवसायामुळे केवळ त्यांच्या कुटुंबालाच फायदा झाला नसून स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मितीलाही चालना मिळाली आहे. खाद्य पुरवठा, वाहतूक, औषधोपचार, विक्री आणि अन्य पूरक सेवा क्षेत्रांनाही या व्यवसायामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी



मिळत असल्याचे चित्र आहे. पोल्ट्री व्यवसायात कोंबड्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेणे आवश्यक असते. यासाठी गवारे दाम्पत्य आधुनिक व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करत आहे. विशेष म्हणजे कोंबड्यांच्या विष्ठेपासून सेंद्रिय खत तयार करून त्याची विक्री केली जाते. त्यामुळे अतिरिक्त उत्पन्न मिळण्याबरोबरच शेतीसाठी दर्जेदार सेंद्रिय खतही उपलब्ध होत आहे. गवारे दाम्पत्याचा हा यशस्वी प्रयोग परिसरातील शेतकरी आणि युवकांसाठी प्रेरणादायी ठरत असून, शेतीला जोडधंदा म्हणून पोल्ट्री व्यवसाय स्वीकारण्याकडे अनेकांचा कल वाढत आहे. कष्ट, चिकाटी आणि योग्य नियोजनाच्या बळावर ग्रामीण भागातही स्वयंरोजगारातून आर्थिक समृद्धी साधता येते, हे गवारे दाम्पत्याने आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले आहे.

### सेंद्रिय खतापासून अतिरिक्त उत्पन्न मिळते

कष्ट, योग्य नियोजन आणि आधुनिक व्यवस्थापन यांच्या जोरावर पोल्ट्री व्यवसायातून आर्थिक उन्नती साधणे शक्य आहे. व्यवसायातील प्रत्येक कामाचे नियोजन करून आम्ही उत्पादन वाढविण्यावर भर देत आहोत. कोंबड्यांच्या विष्ठेपासून सेंद्रिय खत तयार करून त्याची विक्री केल्यामुळे अतिरिक्त उत्पन्नही मिळते.

**स्नेहल गवारे.**

### विशेष अनुदान किंवा कर्जयोजना सुरू करावी

पोल्ट्री व्यवसायाला अनेकदा जोखमीचा उद्योग म्हणून पाहिले जाते. त्यामुळे बँका किंवा खासगी वित्तसंस्था सहजपणे कर्ज उपलब्ध करून देत नाहीत. शासनाने पोल्ट्री व्यवसायासाठी विशेष अनुदान व सुलभ कर्ज योजना उपलब्ध करून दिल्यास ग्रामीण युवकांना मोठा आधार मिळेल.

**रामा गवारे.**

# दाळींब येथील आरोग्य उपकेंद्र व अंगणवाडीची जिल्हा परिषद उपाध्यक्ष उषाताई गायकवाड यांच्याकडून पाहणी



आरंभ मराठी । दाळींब

उमरगा तालुक्यातील दाळींब येथे मंगळवारी (दि.३) जिल्हा परिषद उपाध्यक्ष उषाताई गायकवाड यांनी आरोग्य उपकेंद्र व अंगणवाडी केंद्राला भेट देऊन तेथील कामकाजाची पाहणी केली. यावेळी त्यांनी आरोग्य सेवा, स्वच्छता तसेच बालकांच्या पोषण आहाराबाबत माहिती घेत संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. दाळींब येथील आरोग्य उपकेंद्रात भेटीदरम्यान त्यांनी तेथील विविध समस्या जाणून घेतल्या. परिसर स्वच्छ ठेवणे, नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे तसेच कर्मचारी वेळेवर उपस्थित राहण्याबाबत त्यांनी सूचना केल्या. त्यानंतर अंगणवाडी केंद्राला भेट देऊन बालकांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहाराची माहिती घेतली. अंगणवाडीची पटसंख्या, नळजोडणी, वीजपुरवठा, स्वच्छता आदी सुविधांची पाहणी करून बालकांना गुणवत्तापूर्ण व पौष्टिक आहार देण्यावर भर देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यावेळी दाळींब आरोग्य उपकेंद्राचे डॉ. युवराज चव्हाण, शुभांगी टिकांबरे, अंगणवाडी सेविका फरजाना शेख, गोपाळ जाधव, ज्ञानेश्वर सांगवे, युवराज गायकवाड, खय्युम चाकुरे, धिरज इंगळे, विनोद इंगळे, दयानंद देवकते, मनोज चव्हाण, गणेश इंगवे आदी उपस्थित होते.

### यंदा डीएपी टंचाईची भीती आणि खत दरवाढीचाही फटका; यंदाचा खरीप हंगाम ठरणार आव्हानात्मक

# एल निनोच्या सावटात खत महागाईची भर; खरीप हंगामापूर्वीच बळीराजा चिंतेत

हर्षवर्धन मडके । आरंभ मराठी

**मोहा – यंदाचा खरीप हंगाम सुरू होण्यापूर्वीच शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट उभे ठाकले आहे. एल निनोच्या प्रभावामुळे मान्सून अनिश्चित राहण्याची शक्यता व्यक्त होत असताना खतांच्या किमतींमध्ये झालेली मोठी वाढ आणि डीएपी खताच्या संभाव्य टंचाईने शेतकरी चिंतेत सापडला आहे. उत्पादन खर्च वाढत असताना जिल्ह्यात डीएपीची मागणी आणि उपलब्ध साठा यामध्ये मोठी तफावत दिसून येत आहे. त्यामुळे यंदाचा खरीप हंगाम शेतकऱ्यांसाठी आर्थिक आणि नैसर्गिक दोन्ही पातळ्यांवर कठीण ठरण्याची चिन्हे आहेत.**



यंदाचा खरीप हंगाम अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना राज्यातील शेतकरी नव्या आर्थिक आणि नैसर्गिक संकटांच्या छायेखाली उभा आहे. एकीकडे हवामान तज्ज्ञांनी एल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. पावसात खंड पडणे, कमी पाऊस होणे किंवा पावसाचे असमान वितरण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत असल्याने शेतकऱ्यांचे लक्ष आता मान्सूनकडे लागले आहे. दुसरीकडे खतांच्या किमतींमध्ये झालेली मोठी वाढ आणि डीएपी खताच्या संभाव्य टंचाईने शेतकऱ्यांच्या चिंतेत आणखी भर घातली आहे. गेल्या काही वर्षांपासून हवामान बदलाचे परिणाम अधिक तीव्रतेने जाणवत आहेत. अवकाळी पाऊस, गारपीट, दुष्काळसदृश परिस्थिती आणि तापमानातील असामान्य वाढ यामुळे शेती व्यवसाय आधीच अस्थिर झाला आहे. अशा परिस्थितीत एल निनोचा प्रभाव वाढण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने



खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच शेतकऱ्यांना मोठ्या जोखमीचा सामना करावा लागू शकतो. याच काळात खतांच्या किमतींमध्ये झालेली वाढ शेतकऱ्यांच्या अडचणी वाढवणारी ठरत आहे. जानेवारी-फेब्रुवारी महिन्यांत सुमारे २ हजार १०० रुपयांना मिळणारी एनपीके, डीएपी तसेच विविध मिश्र खते सध्या २ हजार ४५० रुपयांपर्यंत पोहोचली आहेत. अवघ्या पाच महिन्यांत एका गोणीमागे सुमारे ३५० रुपयांची वाढ झाल्याने उत्पादन खर्चात मोठी भर पडली आहे. बियाणे, मजुरी, इंधन आणि सिंचन खर्च आधीच वाढलेला असताना खत महागाईचा अतिरिक्त बोजा शेतकऱ्यांच्या खांद्यावर पडत आहे.कृषी क्षेत्रातील जाणकारांच्या मते, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील कच्च्या मालाच्या वाढलेल्या किमती, वाहतूक खर्चातील वाढ, जागतिक पुरवठा साखळीतील अडथळे आणि विविध देशांतील आर्थिक घडामोडींचा थेट परिणाम खत उद्योगावर होत आहे. मात्र या दरवाढीचा सर्वाधिक फटका शेवटी शेतकऱ्यांनाच बसत असल्याने कृषी क्षेत्रात नाराजीचे वातावरण आहे.

## डीएपी खताच्या टंचाईची भीती

खत महागाईसोबतच यंदा डीएपी खताच्या उपलब्धतेचा प्रश्नही गंभीर बनत आहे. कृषी विभागाने जिल्ह्यासाठी खरीप हंगामाकरिता १९ हजार २०० मेट्रिक टन डीएपी खताचे आवंटन मंजूर केले आहे. मात्र प्रत्यक्ष उपलब्ध साठा आणि वाढती मागणी पाहता परिस्थिती चिंताजनक असल्याचे चित्र आहे. कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार, यंदा जिल्ह्यात डीएपी खताची मागणी तब्बल १५ हजार ९२३ मेट्रिक टन इतकी आहे. मात्र सध्या उपलब्ध असलेला साठा केवळ ६ हजार २२७ मेट्रिक टन आहे. म्हणजेच मागणीच्या तुलनेत निम्म्याहून कमी खत उपलब्ध असल्याने पेरणीच्या काळात खतासाठी शेतकऱ्यांना मोठी धावपळ करावी लागू शकते. विशेष म्हणजे, गेल्या खरीप हंगामात जिल्ह्यात ९ हजार ७६५ मेट्रिक टन डीएपी खताचा वापर झाला होता. यंदा मात्र मागणी थेट १५ हजार ९२३ मेट्रिक टनांपर्यंत पोहोचली आहे. म्हणजेच गेल्या वर्षाच्या तुलनेत सुमारे ६ हजार मेट्रिक टन अधिक मागणी नोंदवली गेली आहे. एप्रिल आणि मे महिन्यांसाठी प्रशासनाने एकूण ४ हजार ८०० मेट्रिक टन डीएपीचे आवंटन मंजूर केले होते. जून महिन्यासाठी ४ हजार ९९० मेट्रिक टन आवंटन निश्चित करण्यात आले आहे.

## शेतकऱ्यांनी युरियाचा वापर वाढवला

खतांच्या वाढत्या किमतींमुळे अनेक शेतकरी तुलनेने स्वस्त असलेल्या युरियाचा वापर वाढवत असल्याचे दिसून येत आहे. मात्र कृषी तज्ज्ञांनी याबाबत सावधगिरीचा इशारा दिला आहे. युरियाचा अतिरेक केल्यास जमिनीतील पोषण संतुलन बिघडून सेंद्रिय कार्बन कमी होतो आणि जमिनीची उत्पादनक्षमता घटण्याचा धोका निर्माण होतो.याच पार्श्वभूमीवर कृषी विभागाने शेतकऱ्यांना डीएपीवरील अवलंबित्व कमी करण्याचे आवाहन केले आहे. टीएसपी, एसएसपी तसेच विविध संयुक्त खतांचा वापर करून नत्र, स्फुरद आणि पालाश यांसारखी आवश्यक अन्नद्रव्ये संतुलित प्रमाणात मिळू शकतात. विशेषतः एसएसपीमधील सल्फर तेलबिया पिकांसाठी अत्यंत उपयुक्त मानले जाते.



## पर्यायी खतांचा वापर करा

शेतकऱ्यांनी केवळ डीएपी खताचाच आग्रह न धरता शेतकऱ्यांनी पर्यायी खतांचा वापर करावा. उपलब्ध साठा वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

**नागेश पाटील**
**कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव.**

## खतांच्या किमतींमध्ये मोठी वाढ

| खत दर | जानेवारी-फेब्रुवारी दर | सध्याचा |
|---|---|---|
| एनपीके मिश्र खत | २,१०० | २,४५० |
| डीएपी / मिश्र खत | २,१०० | २,४५० |
| एसएसपी | २,१०० | २,४५० |

युरिया अनुदानित तुलनेने स्थिर
अवघ्या पाच महिन्यांत प्रति गोणी सुमारे ३५० पर्यंत वाढ.

## दृष्टिक्षेपात डीएपीची स्थिती

खरीप २०२५ मधील वापर : ९,७६५ मे.टन
खरीप २०२६ मधील मागणी : १५,९२३ मे.टन
सध्या उपलब्ध साठा : ६,२२७ मे.टन
वाढलेली अतिरिक्त मागणी : सुमारे ६,००० मे.टन
जिल्ह्याचे मंजूर आवंटन : १९,२०० मे.टन

## डीएपीला पर्यायी खतांचे पर्याय

अर्धी गोणी युरिया + १ गोणी टीएसपी
अर्धी गोणी युरिया + ३ गोणी एसएसपी
एनपीके १०:२६:२६
एनपीके २०:२०:०:१३
एनपीके १२:३२:१६
एनपीके १५:१५:१५
युरिया-एसएसपी कॉम्प्लेक्स

# पेट्रोल न मिळाल्याच्या रागातून मध्यरात्री राडा

## भूममधील पाईप कंपनीचे लाखोंचे नुकसान

आरंभ मराठी । भूम

भूम-पार्डी रोड परिसरात मंगळवारी (दि.२) मध्यरात्री घडलेल्या धक्कादायक घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे. पेट्रोल मिळाले नसल्याच्या कारणावरून संतप्त झालेल्या दोन युवकांनी दहशत माजवण्याचा प्रयत्न करत एका पाईप कंपनीच्या परिसरात पेट्रोल शिंपडून आग लावल्याची घटना घडली. या आगीत कंपनीचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित युवकांनी प्रथम परिसरातील एका पेट्रोल पंपावर जाऊन पेट्रोलची मागणी केली. मात्र पेट्रोल उपलब्ध नसल्याचे सांगितल्यानंतर त्यांनी तेथील कर्मचाऱ्यांशी वाद घालत गोंधळ घातला. त्यानंतर हे दोघे युवक जवळील पाईप कंपनीच्या परिसरात गेले आणि तेथे पेट्रोल शिंपडून आग लावल्याचा आरोप आहे. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले. कंपनीतील पाईप, कच्चा माल तसेच काही यंत्रसामग्री आगीत जळून खाक झाली. आगीच्या ज्वाळा आणि धुराचे लोट दूरवरून दिसत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.दरम्यान, संपूर्ण घटना कंपनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून त्यामध्ये दोन युवकांची हालचाल स्पष्टपणे दिसत असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेऊन आरोपींचा शोध सुरू केला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आगीवर नियंत्रण मिळविले असून पंचनामा व नुकसानाचे मूल्यांकन सुरू आहे. या घटनेत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकारामुळे भूम शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून आरोपींना तातडीने अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# मोफत गणवेश योजनेचे नवे निकष जाचक; जुनेच निकष कायम ठेवण्याची मागणी

आरंभ मराठी । मुंबई

मोफत गणवेश योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनाने यंदा लागू केलेले नवे निकष शाळांसाठी अडचणीचे ठरत असल्याने चालू शैक्षणिक वर्षासाठी जुनेच निकष कायम ठेवावेत, अशी मागणी अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाने केली आहे.राज्याध्यक्ष देविदास बस्वदे आणि सरचिटणीस कल्याण लवांडे यांनी शिक्षणमंत्री, शिक्षण सचिव व समग्र शिक्षा संचालक यांना निवेदन दिले आहे. मे अखेरीस शासन निर्णय जाहीर झाल्याने महिला बचत गटांकडून वेळेत गणवेश तयार करणे कठीण असल्याचे संघटनेने म्हटले आहे. कापडाच्या गुणवत्तेची तपासणी करण्यासाठी शाळांकडे यंत्रणा नसल्याने शासनाने अधिकृत पुरवठादार निश्चित करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच दुर्गम भागात महिला बचत गट उपलब्ध नसल्याने मुख्याध्यापकांना स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचे अधिकार द्यावेत, असेही संघटनेचे म्हणणे आहे. 'स्काऊट-गाईड' गणवेशासाठी लागणारे कापड उपलब्धतेची समस्या आणि अपुरे अनुदान याकडेही संघटनेने लक्ष वेधले आहे. त्यामुळे निकषांमध्ये शिथिलता देऊन सुधारित सूचना जारी कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. हीमाहितीराज्यउपाध्यक्षलालासाहेबमगर,जिल्हाध्यक्ष बशीर तांबोळी, सरचिटणीस अविनाश मोकाशे आणि कार्याध्यक्ष बाळासाहेब वाघमारे यांनी दिली

# दुधनाळ बसस्थानकात गर्दीचा फायदा घेत चार महिलांची मंगळसूत्रे अज्ञात चोरट्यांनी चोरली

**उमरगा** :- उमरगा तालुक्यातील दुधनाळ बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने चार महिलांची मंगळसूत्रे चोरून नेल्याची घटना मंगळवारी (दि.२) घडली. या प्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शांताबाई धनराज सोमवंशी (वय ८०, रा. नारंगवाडी, ता. उमरगा) यांच्यासह कविता गुळगे (रा. दुधनाळ), सुनंदा सोनटक्के (रा. बेंबळी) आणि उज्वला गावडे (रा. पाचगाव, ता. करवीर, जि. कोल्हापूर) या महिला दिनांक २ जून रोजी सकाळी साडेअकरा वाजता दुधनाळ बसस्थानक परिसरात होत्या. यावेळी अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेत त्यांच्या गळ्यातील एकूण २९ ग्रॅम वजनाची मनी मंगळसूत्रे चोरून नेली. चोरीस गेलेल्या दागिन्यांची एकूण किंमत सुमारे १ लाख ४५ हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेप्रकरणी शांताबाई सोमवंशी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उमरगा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, अज्ञात चोरट्याचा शोध घेण्याचे काम पोलीसांकडून सुरू आहे.

# धाराशिव शहरात कोयता बाळगणाऱ्या दोन तरुणांवर शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात विनापरवाना लोखंडी कोयता बाळगून नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण केल्याप्रकरणी दोन युवकांविरुद्ध शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दत्ता भानुदास काळे (वय 21) व अर्जुन संजय पवार (वय 21, दोघे रा. पापनास नगर, पारधी पिडी, धाराशिव) हे 2 जून 2026 रोजी पहाटेच्या सुमारास भन्साळी मेडिकलसमोर, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे संशयास्पदरीत्या फिरताना आढळून आले. धाराशिव शहर पोलीसांच्या पथकाने तपासणी केली असता त्यांच्या ताब्यात विनापरवाना बेकायदेशीररित्या लोखंडी कोयता असल्याचे निष्पन्न झाले. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलीसांनी संबंधित कोयता जप्त केला. याप्रकरणी पोलीस अंमलदार अशोक बाबासाहेब शेंडगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात शस्त्र कायदा कलम 4, 25 तसेच भारतीय न्याय संहिता कलम 3(5) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

आरंभ मराठी

### रस्ते, नाले आणि नागरी सुविधांचा प्रश्न ऐरणीवर

# प्रशासकाविना पळसप ग्रामपंचायतचा कारभार रामभरोसे

आरंभ मराठी । पळसप





पळसप ग्रामपंचायतीचा कार्यकाळ संपून अनेक महिने उलटून गेले असतानाही अद्याप प्रशासकाची नियुक्ती करण्यात आलेली नाही, तसेच ग्रामपंचायत निवडणुकांचाही कोणताही निर्णय झालेला नाही. परिणामी गावातील विविध विकासकामे रखडली असून नागरिकांना मूलभूत सुविधांअभावी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रशासनाच्या या निष्क्रियतेबद्दल ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. गावातील अनेक रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. पाणीपुरवठा योजनेसाठी पाईपलाईन टाकताना अनेक ठिकाणी रस्ते खोदण्यात आले होते. मात्र काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आलेली नसल्याने ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहनधारकांसह पादचाऱ्यांनाही त्रास सहन करावा लागत आहे. आगामी पावसाळ्यात ही परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, करंजकर गल्ली परिसरात नाल्यांची व्यवस्था नसल्याने घरगुती सांडपाणी थेट रस्त्यावर साचत आहे. पाईपलाईनसाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्यांमध्ये हे पाणी जमा होत असल्याने दुर्गंधी, अस्वच्छता आणि डासांची उत्पत्ती वाढली आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. 'उन्हाळ्यातच रस्त्यांची अशी अवस्था असेल तर पावसाळ्यात नागरिकांना घराबाहेर पडणेही कठीण होईल. पावसाळ्यापूर्वी तातडीने रस्त्यांची दुरुस्ती होणे आवश्यक आहे. मात्र ग्रामपंचायतीचा प्रशासक कोण आहे, हेच माहीत नसल्याने समस्या मांडायची तरी कुणाकडे, असा प्रश्न निर्माण झाला आहे,' अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी पंचायत समितीचे सभापती आणि गटविकास अधिकारी यांना निवेदन देण्याचा निर्णय घेतला असून, तातडीने प्रशासकाची नियुक्ती करून गावातील प्रलंबित प्रश्न सोडवावेत, अशी मागणी केली आहे. प्रशासकाच्या अभावामुळे विकासकामे ठप्प झाली असून नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असल्याचे चित्र पळसपमध्ये दिसून येत आहे.

# बोरी धरणात केवळ ३० टक्के पाणीसाठा; पाण्याचा उपसा थांबवा

## तुळजापूर, नळदुर्ग नगर पालिकेच्या नगराध्यक्षांनी घेतली जिल्हाधिकाऱ्यांची भेट

**नळदुर्ग** :- येणाऱ्या पावसाळ्यात एल निनोचे सावट असल्याने होणारा पर्जन्यमान कमी होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. तुळजापूरसह नळदुर्ग शहराला आणि ग्रामीण भागाला पाणी पुरवठा करणाऱ्या बोरी धरणात केवळ ३० टक्के पाणीसाठा उरल्याने उर्वरित पाणी पिण्यासाठी आरक्षित करावे,अशी मागणी नळदुर्गचे नगराध्यक्ष बसवराज धरणे व तुळजापूरचे नगराध्यक्ष विनोद गंगणे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. दोन्ही नगराध्यक्षांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन परिस्थिती अवगत केली.

यासंदर्भात दिलेल्या पत्रात म्हटले आहे की नळदुर्गच्या बोरी धरणातून तुळजापूर, नळदुर्ग या मोठ्या शहरासह ग्रामीण भागातील अणदूर, मानेवाडी, चिकुंद्रा, मूरटा आदी गावांना नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. दरम्यान यावर्षी पाण्याची टंचाई भासत नसली तरी एल निनोच्या सावटामुळे होणारा पावसाळा हा सरासरी पेक्षा बराच कमी होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. त्यामुळे भविष्यात कमी पावसाळा असल्याने बोरी धरण पूर्ण क्षमतेने भरेल की नाही याबाबत शंका आहे. त्यामुळे पुढच्या वर्षी पाण्याची टंचाई भासू नये यासाठी उपाययोजना म्हणुन बोरी धरणातील पाणी पिण्यासाठी आरक्षित करणे हे महत्वाचे आहे. सद्या बोरी धरणात 30 टक्क्यापेक्षाही कमी पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. त्यामुळे भविष्यातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाने बोरी धरणातील पाणी पिण्यासाठी आरक्षित करणे गरजेचे आहे. शिवाय सद्या बोरी धरणाच्या कालव्यातून मोठ्या प्रमाणात पाणी



उपसा होत आहे. त्यामुळे पुढील वर्षी पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यानुषंगाने बोरी धरणातील पाणी आरक्षित होणे आवश्यक आहे. या सर्व बाबीचा विचार करून नळदुर्गचे नगराध्यक्ष बसवराज धरणे, तुळजापूरचे नगराध्यक्ष विनोद गंगणे यांनी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्याकडे बोरी धरणातील पाणी पिण्यासाठी आरक्षित करण्यात यावे या मागणीचे पत्र दिले आहे. या पत्रात पुढे म्हटले आहे की, अल निनो च्या प्रभावामुळे या वर्षी देशात सरासरी पेक्षा पाऊस कमी होण्याचा अंदाज हवामान खाते व इतर संस्था यांनी व्यक्त केला आहे, त्या पार्श्वभूमीवर नळदुर्ग व तुळजापूर या दोन्ही शहरात पुढील वर्षी पाणी टंचाई निर्माण होऊ नये याची खबरदारी घेण्यासाठी व या दोन्ही शहरात बाहेर गावावरून येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे, त्यामुळे या दोन्ही शहराची तरल लोकसंख्या अधिक आहे, त्यामुळे बोरी धरणातून होणारा पाण्याचा उपसा तात्काळ थांबविणे गरजेचे असून बोरी धरणतील पाणी पिण्यासाठी आरक्षित करावे असे ही या पत्रात म्हंटले आहे, दरम्यान या पूर्वी ही नळदुर्ग नगरपालिकेने 25 मे 2026 रोजी ही बोरी धरणातील पाणी आरक्षित करण्यात यावे या मागणीचे पत्र जिल्हाधिकारी यांच्या कडे दिले होते. दरम्यान या वेळी नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी सांगितले की, भविष्यातील अल निनो च्या प्रभावामुळे भविष्यात पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही, त्यामुळे पाणी आरक्षीत करण्यासाठी मागणी केली असून जिल्हाधिकारी यांनी ही तात्काळ बोरी धरणतील पाणी उपसा बंद करण्याचे आश्वासन दिले आहे.

# खेड येथे रावे (RAWE) कार्यक्रमांतर्गत ग्रामभेट; ग्रामीण कृषी विकासासाठी विद्यार्थ्यांचा पुढाकार



**आरंभ मराठी । धाराशिव**

बी.एस्सी. (कृषी) अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या रावे (RAWE - Rural Agricultural Work Experience) कार्यक्रमांतर्गत मंगळवारी (दि.२) खेड (ता. जि. धाराशिव) येथे ग्रामभेट व परिचय बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायत कार्यालय, खेड येथे भेट देऊन सरपंच, ग्रामसेवक, रोजगार सेवक तसेच ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. रावे कार्यक्रमाची संकल्पना, उद्दिष्टे, ग्रामीण कृषी विकासामधील विद्यार्थ्यांची भूमिका तसेच आगामी काळात गावात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. ग्रामपंचायत प्रशासनाने विद्यार्थ्यांचे स्वागत करून कार्यक्रमास सर्वतोपरी सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली. या भेटीदरम्यान गावातील कृषी परिस्थिती, शेतकऱ्यांच्या समस्या आणि कृषी विकासाच्या संधी यांवरही चर्चा करण्यात आली. या प्रसंगी विद्यार्थी करण ढगे, कुणाल बामणकर, हर्षवर्धन धुरगुडे, अक्षय घुले, प्रतिक कांबळे, पृथ्वीराज कदम आणि यश देशमाने उपस्थित होते. प्रा. डी. एस. शेटे (रावे इन्चार्ज) व कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. डी. डोके यांच्या मार्गदर्शनाखाली सदर ग्रामभेट व परिचय बैठक यशस्वीपणे पार पडली.

आरंभ मराठी